आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र संध्याकाळी  ७.०० वाजता

२३  मार्च २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानासाठी राज्यात १० उमेदवारांचे अर्ज दाखल, २३ कोटी रुपयांची रोख रक्कम जप्त

- लोकसभा निवडणुकीविषयी वंचित बहुजन आघाडी २६ मार्च रोजी भूमिका जाहीर करणार

- कांद्यावरच्या निर्यात बंदीला केंद्र सरकारकडून अनिश्चित काळासाठी मुदतवाढ

- कुख्यात गुंड विठ्ठल पुजारीचं आज चीनमधून प्रत्यार्पण

**आणि**

- कोकणासह राज्यभर होळीचा उत्साह, नैसर्गिक रंगाच्या खरेदीकडे कल

**<><><><><><>**

पहिल्या टप्प्यातल्या मतदानासाठी राज्यात आतापर्यंत १० जणांनी लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरले आहेत. नागपूरमध्ये ५, रामटेकमध्ये १, भंडारा-गोंदिया आणि गडचिरोली-चिमूर मतदारसंघात प्रत्येकी दोघांनी उमेदवारी अर्ज भरल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी मुंबईत पत्रकार परिषदेत दिली.

राज्यात आतापर्यंत २३ कोटी रुपयांची रोख रक्कम, १७ लाख लीटर मद्य, सुमारे ७०० किलो अंमलीपदार्थ, ४६ किलो सोनं चांदी आणि मोफत वाटायच्या १ लाखांहून अधिक वस्तू जप्त केल्याची माहिती त्यांनी दिली. यात मुद्देमालाची तपासणी सुरू असून कायदेशीर असलेला मुद्देमाल संबंधितांना परत केला जाईल,

असं ते म्हणाले. राज्यातल्या १३ हजार १४१ व्यक्तींवर भारतीय दंड संहितेअंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई झाली आहे. परवाना नसलेली ३०८ शस्त्र जप्त केली असून परवाना असलेली ४५ हजार ७५५ शस्त्र ताब्यात घेणं, जप्त करणं किंवा आवश्यकतेनुसार वापरण्याची परवानगी दिली आहे. राज्यात परवाना दिलेली ७७ हजार १४८ शस्त्र असून उर्वरित शस्त्रांची पडताळणी सुरू असल्याचं चोकलिंगम म्हणाले.

राज्यात सुमारे ९८ हजार मतदान केंद्र उभारली जाणार असून गेल्या आठवड्यात निवडणूक जाहीर झाल्यापासून १ लाख ८४ हजार ८४१ मतदारांची राज्यात नोंद झाल्याची माहिती त्यांनी दिली. लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या १० दिवस आधीपर्यंत मतदार यादीत नाव नोंदवता येतं. त्यामुळं अधिकाधिक व्यक्तींनी मतदार यादीत नाव नोंदवावं, मतदार यादीतल्या नावाची पडताळणी करावी आणि मतदान करावं, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची नावं निश्चित करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची आज नवी दिल्ली इथं पक्षाच्या मुख्यालयात बैठक होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह समितीचे सदस्य आणि राज्यांतील पदाधिकारी या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. या बैठकीपूर्वी नवी दिल्लीत त्यांनी उदयनराजे भोसले यांची भेट घेतली. यावेळी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेही उपस्थित होते.

**<><><><><><>**

अमरावती लोकसभेची जागा भाजपाचा उमेदवार लढवणार असून लवकरच त्या नावाची घोषणा केली जाईल असं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात माध्यम प्रतिनिधींशी बोलताना सांगितलं. रामटेक मध्ये शिवसेना शिंदे गटाचा उमेदवार निवडणूक लढवेल तर उर्वरित जागांवरचा जागावाटपाचा प्रश्न लवकरच सुटेल, असं ते म्हणाले. महायुतीला ५० टक्क्याहून जास्त मतं मिळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><><>**

राज्यातल्या महायुतीचा भाग असलेले प्रहारचे आमदार बच्चू कडू यांनी अमरावती मतदारसंघातून विद्यमान खासदार नवनीत राणा यांच्या उमेदवारीला विरोध केला आहे. ते आज अमरावती इथं बातमीदारांशी बोलत होते. या मतदारसंघात आमचे दोन आमदार असून, किमान लाखभर मतांचं पाठबळ आपल्याकडे आहे. त्यामुळं या जागेवर आमचाच दावा असायला हवा होता, असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सहभागी होणार आहेत. यानंतर शिरुर लोकसभा मतदारसंघातून अजित पवार यांच्या पक्षाकडून उमेदवारी मिळेल, असा विश्वास त्यांनी आज मुंबईत अजित पवार यांची भेट घेतल्यानंतर व्यक्त केला. याविषयावर एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा झाल्याचं ते म्हणाले. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणूक शरद पवार यांच्या पक्षासोबत असलेले खासदार अमोल कोल्हे यांनी त्यांना ५८ हजार मतांनी पराभूत केलं होतं.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीविषयी वंचित बहुजन आघाडी २६ मार्च रोजी भूमिका जाहीर करणार आहे. महाविकास आघाडीनं ४ नव्हे केवळ ३ जागा वंचितला देऊ केल्या होत्या, असा दावा राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत केला. अकोल्याची जागा नको हे आधीच स्पष्ट केल्यानं केवळ २ जागा आमच्याकडे शिल्लक राहिल्या आहेत. महाविकास आघाडी आमचं म्हणणं ऐकून घेत नसल्याचा दावा त्यांनी केला.

कोल्हापूर लोकसभा मतदारसंघात शाहू महाराजांना निवडून आणण्यासाठी जे जे प्रयत्न करावे लागतील ते सर्व आमच्या पक्षाच्या वतीनं केले जातील. मागच्यावेळी जे घडले ते या वेळी घडू नये याची दक्षता घेऊ, असंही ते म्हणाले.

मंत्रीमंडळाच्या निर्णयाची चौकशी न्यायालय किंवा तपास संस्थांमार्फत होऊ शकत नाही. तरी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक करुन या प्रकरणाला मनी लाँड्रींगचं रुप दिल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><><><>**

केंद्र सरकारनं कांद्यावरची लावलेली निर्यात बंदी पुन्हा अनिश्चित काळासाठी वाढवली आहे. याबाबतची अधिसूचना काल जारी करण्यात आली. याआधी कांदा निर्यात बंदी ३१ मार्च पर्यंत लागू करण्यात आली होती.

बाजारामध्ये लाल कांदा संपला असून उन्हाळा कांदा येण्यास सुरुवात झाली आहे. आता शेतकऱ्यांना दोन पैसे मिळण्याची अपेक्षा होती. त्यावेळी घेतलेला निर्यात बंदीचा निर्णय शेतकरी विरोधी असल्याचा आरोप स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संदीप जगताप यांनी केला.

**<><><><><><>**

समुद्रात होत असलेल्या चाचेगिरीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तैनात केलेली आय एन एस कोलकाता ही युद्धनौका ताब्यात घेतलेल्या ३५ सोमाली चाच्यांना घेऊन आज मुंबईत दाखल झाली. या चाच्यांना यलो गेट पोलिसांच्या हवाली करण्यात आलं आहे.

एडनच्या आखातात ही युद्धनौका तैनात होती. नौकेवर सागरी चाच्यांच्या संशयास्पद हालचालींवर ड्रोनच्या सहाय्यानं ताबा मिळवल्यावर भारतीय नौदलानं आय एन एस कोलकाताच्या माध्यमातून या चाच्यांना ताब्यात घेतलं होतं. या चाच्यांनी नौदलाच्या अधिकाऱ्यांवर गोळीबार केल्यानं त्यांना भारतात आणल्याची माहिती नौदलाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

**<><><><><><>**

कुख्यात गुंड विठ्ठल पुजारी उर्फ प्रसाद पुजारी याचं आज चीनमधून भारतात प्रत्यार्पण झालं. मुंबई पोलीसांच्या गुन्हे शाखेनं त्याला आज मुंबईत आणलं. पुजारी विरोधात खुन, खनाचा प्रयत्न, खंडणी, फौजदारी कट रचणे, शस्त्रास्त्र बाळगणे अशा प्रकारचे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. मात्र तो देशाबाहेर फरार झाला होता. त्याचा माग घेत असताना, भारतीय गुप्तचर यंत्रणेनं दिलेल्या माहितीआधारे, चीनच्या सुरक्षा यंत्रणेनं त्याला फेब्रुवारी २०२३ मध्ये हाँगकाँग इथं खोटा पासपोर्ट बाळगल्याप्रकरणी अटक केली होती. यानंतर भारतानं त्याला आपल्या ताब्यात देण्यासाठी सातत्यानं केलेल्या प्रयत्नांनंतर त्याचं भारतात प्रत्यार्पण केलं गेलं.

**<><><><><><>**

उद्या होत असलेल्या होलिका दहन आणि सोमवारी साजऱ्या होत असलेल्या धुलीवंदनानिमित्त राज्यातल्या बाजारपेठा सजल्या आहेत. होळीसाठी आलेले रंग, पिचकाऱ्या यांची दुकानं सर्वत्र दिसत आहेत. त्यात रासायनिक रंगांपेक्षा नैसर्गिक

रंगांना मागणी असल्याचं दिसून येत आहे. राज्यासह देशाच्या विविध भागात धुळवड मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते.

परभणीच्या वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी हानिकारक रासायनिक रंगांना पर्याय म्हणून मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक रंग तयार करून त्याची विक्री केली. बीट, पालक, हळद, पळसाची पानं, नीळ पावडर, आरारुट पावडर यापासून विद्यार्थ्यांनी लाल, हिरवा, पिवळा, निळा, जांभळा असे वेगवेगळे रंग बनवले आहेत.

सिडकोच्या मेट्रो मार्ग क्रमांक १ बेलापूर ते पेणधर या मार्गावरची मेट्रो सेवा येत्या सोमवारी धूलिवंदनानिमित्त सकाळच्या वेळेत बंद राहणार आहे. दुपारी २ पासून रात्री १० पर्यंत मेट्रो सुरू राहील.

**<><><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात उद्यापासून होळी उत्सवाला सुरुवात होतेय. जिल्ह्यात ५३८ सार्वजनिक तर ५९८ अशा एकूण १ हजार १३६ ठिकाणी होळीचं पूजन होणार आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या वार्ताहरांकडून…

**होल्ड - व्हाइस कास्ट**

**<><><><><><>**

परभणीमध्ये जिंतूर शहरात रात्रीच्या गस्ती दरम्यान पोलिसांनी साडेदहा लाखाचा गुटखा आणि वाहन जप्त केलं. संशयास्पदरित्या फिरणाऱ्या बोलेरो गाडीचा पाठलाग करुन जिंतूर पोलिसानी ही कारवाई केली.

**<><><><><><>**

आयपीएलमध्ये दिल्ली कॅपीटल्सनं पंजाब किंग्जसमोर विजयासाठी १७५ धावांचं आव्हान ठेवलं आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा पंजाब किंग्जनं १७ षटकात ४ गडी बाद १४७ धावा केल्या होत्या.

स्पर्धेत आज संध्याकाळी साडेसात वाजता कोलकत्ता क्नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यात सामना होणार आहे. यात सनरायझर्सनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><><>**

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वात हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><><>//**